जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-09/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 28.07.2021

**दिनांक 30.07.2021 रोजी आयोजीत करण्यात आलेली ONLINE सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका**
**आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव**

**विषय क्रं. 01**

**विषय :-** महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार व सार्वजनिक आरोग्य विभाग 10वा माळा जी.टी. रुग्णालय आवार, नविन मंत्रालय मुंबई दिनांक 14 जानेवारी 2021 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड कार्यक्षेत्रामध्ये महाराष्ट्र सुश्रुषागृह नोंदणी (सुधारीत) नियम 2021 सुधारणा लागु करणे बाबत.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार व सार्वजनिक आरोग्य विभाग 10वा माळा जी.टी. रुग्णालय आधार, नविन मंत्रालय मुंबई दिनांक 14 जानेवारी 2021 अधिसुचनेचे नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड कार्यक्षेत्राअंतर्गत सर्व खाजगी रुग्णालयाच्या आंतररुग्ण विभागाचे मुंबई सुश्रुषागृह नोंदणी व नुतनीकरण शुल्क हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड सर्वसाधारण सभेने दिनांक 21.09.2015 रोजी समंत केलेला ठराव क्रं 65 अन्वये घेण्यात येत होते. व हे शुल्क 03 वर्षाकरिता घेतले जाते, नुतनीकरण हे 01 फेब्रुवारी ते 30 एप्रिल पर्यंत केले नसल्यास रुपये 10,000/- विलंब शुल्क आकारण्यात येतो. सदरील अधिसुचनेमध्ये सुधारणा करण्यात आलेल्या असुन त्यामध्ये या नियमांना महाराष्ट्र सुश्रुषागृह नोंदणी (सुधारीत) नियम 20214 मध्ये संबोधण्यात यावे असे अधिसुचनेत नमुद केले आहे.

1- नियम 3 मध्ये नोंदणीचा नमुना ``ए`` प्रमाणे नोंदवही सेल तसेच
2- नियम 5 मध्ये नमुना ``**सी**`` मध्ये सर्व नोंदणी प्रमाणपत्र संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
3- नियम 6 (1) मध्ये ज्या वर्षात नोंदणी / नुतनीकरण कालावधी संपुष्टात येईल त्या वर्षाच्या जानेवारी महिण्यात आगाऊ अर्ज केला जावा.
4- नियम 7 नुसार नोंदणीसाठी व नुतनीकरणासाठी सुश्रुषागृहातील खाटानुसार शुल्क आकारणे बाबत बदल केला आहे. व नुतनीकरणासाठी पुर्व नोंदणीच्या आकारलेल्या शुल्काच्या 25 टक्के वाढीव शुल्कासह शुल्क आकारले जाईल.
5- मुख्य नियमातील नियम 11 मध्ये 11(अ) ते 11(के) पर्यंत सुधारणा नियम समाविष्ठ केले आहेत.
   1) सदरील शुल्क हे 03 वर्षा करिता राहील
   2) नोंदणी वैधता 03 वर्षाच्या 31 मार्च ही राहील
   3) नुतनीकरणासाठी दिनांक 01 जानेवारी ते 31 मार्च पर्यंत आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.
   4) नोंदणी वैधता समाप्तीनंतर दिनांक 01 एप्रिल पासुन रुपये 10,000/- विलंब शुल्क आकारण्यात येईल.

**सुधारीत अधिसुचनेनुसार नोंदणी व नुतनीकरण शुल्क (खाटांच्या संख्येनुसार)**

| अ.क्र. | खाटांची संख्या | नोंदणी शुल्क | नुतनीकरण शुल्क 25 टक्के वाढीव |
|---|---|---|---|
| 01 | 01 ते 05 | 3500/- | 4,375/- |
| 02 | 06 ते 10 | 7,000/- | 8,750/- |
| 03 | 11 ते 15 | 10,500/- | 13,125/- |
| 04 | 16 ते 20 | 14,000/- | 17,500/- |
| 05 | 21 ते 25 | 17,500/- | 21,875/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 06 | 26 ते 30 | 21,000/- | 26,250/- |
| 07 | 31 ते 35 | 24,500/- | 30,625/- |
| 08 | 36 ते 40 | 28,000/- | 35,000/- |
| 09 | 41 ते 45 | 31,500/- | 39,375/- |
| 10 | 46 ते 50 | 35,000/- | 43,750/- |
| 11 | 51 ते 55 | 38,500/- | 48,125/- |
| 12 | 56 ते 60 | 42,000/- | 52,500/- |
| 13 | 61 ते 65 | 45,500/- | 56,875/- |
| 14 | 66 ते 70 | 49,000/- | 61,250/- |
| 15 | 71 ते 75 | 52,500/- | 65,625/- |
| 16 | 76 ते 80 | 56,000/- | 70,000/- |
| 17 | 81 ते 85 | 59,500/- | 74,375/- |
| 18 | 86 ते 90 | 63,000/- | 78,750/- |
| 19 | 91 ते 95 | 66,500/- | 83,125/- |
| 20 | 96 ते 100 | 70,000/- | 87,500/- |

101 ते पुढील खांटासाठी नोंदणी / नुतनीकरण शुल्काच्या खाटांच्या संख्येनुसार वाढीव 5 खाटांच्या दरानुसार आकारण्यात येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे नोंदणी व नुतनीकरण शुल्का आकारण्याच्या करिता मनपा सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**विषय क्रं. 02**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी अर्धवेट वैद्यकिय अधिकारी यांच्या एकत्रित वेतन/मानधनात वाढ करणे बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी अर्धवेळ वैद्यकिय अधिकारी या पदावर डॉ. भाग्यश्री पाटील व डॉ. शिवाजी धोपटे हे दिनांक 04.02.2021 पासुन हैदरबाग युसीएचसी येथे कार्यरत असुन त्यांना मासिक एकत्रित वेतन रुपये 28,000/- एनयुएचएम निधीतुन करण्यात येते. संबंधीतांनी केलेल्या विनंती अर्जानुसार संबंधीत कंत्राटी अर्धवेळ वैद्यकिय अधिकारी यांनी त्यांच्या एकत्रित वेतनात वाढ करण्या संबंधीत विनंती केली असुन एनयुएचएम अंतर्गत कार्यरत इतर अर्धवेळ वैद्यकिय अधिकारी यांना मनपा निधीतुन अतिरिक्त अदाई करण्यात येत असलेल्या वेतना प्रमाणे रुपये 36,000/- (अक्षरी रुपये छत्तीस हजार रुपये फक्त) प्रतीमहा मानधन हे संबंधीतांना त्यांच्या नियुक्ती दिनांका पासुन मनपा निधीतुन देण्यासंबंधीत विनंती केली आहे.

याकरिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत उपरोक्त नमुद केलेल्या दोन कंत्राटी अर्धवेळ वैद्यकिय अधिकारी यांना रुपये 36,000/- प्रतिमहा मानधन हे त्यांच्या नियुक्ती दिनांकापासुन मनपा निधीतुन देण्याकरिता प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना**

**विषय क्रं. 03** **प्रस्ताव**

नांदेड शहरातील शिवाजीनगर वाडीया डॉक्टर लेन परिसरातील दवाखाण्यामुळे वाढलेली रहदारी व मागे वाढलेली वस्ती, त्यामुळे शिवाजीनगर मुख्यरस्ता, जनता मार्केट परिसरात अरुंद रस्त्यामुळे रहदारीचा प्रश्न नेहमी निर्माण होत आहे त्यावर चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**विषय क्रं. 04** **प्रस्ताव**

शिफा वेल्फेअर एज्युकेशन अन्ड कल्चरल सोसायटी नांदेड या शासन मान्य अल्पसंख्यांक संस्था असून या संस्थेव्दारा पूर्व प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा, लेबर कॉलनी येथे चालविले जाते. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची लेबर कॉलनी येथील मोकळी जागा 170X70 फुटची जागा सदर सस्थेस शैक्षणिक कामाकरिता दिनांक 25.07.2013 रोजी रजि. भाडेपट्टा करुन नाममात्र वार्षिक भाडे रुपये 1000/- आकारुन दिलेली होती. आता सदर संस्थेस दर 03 वर्षाची मुदतवाढ व भाडेवाढ करण्यात आली.

करिता याविषयी सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की दर 03 वर्षाची मुदतवाढ बदलुन वार्षिक भाडे रुपये 10,000/- प्रमाणे मुदतवाढ मान्य करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- दुष्यंत सोनाळे **अनुमोदक** :- नगानाथ गड्डम, सलीमा बेगम नुरुल्ला खान

**विषय क्रं. 05** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी या अभिनामाच्या पदांची संख्या विचारात घेता व नागरिकांना आरोग्य सुखसुविधा पुरविण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 68 दि. 08.08.2011 अन्वये मान्यता प्रदान करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 63, 54 मधील तरतुदीनुसार सरळ सेवा भ्रतीतील जाहिरात, लेखी व तोंडी परिक्षेच्या विहित पध्दतीचा अवलंब करुन निवड समिती मार्फत गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या (1) डॉ. कोटलवार श्रुती रवि (2) डॉ. राठोड विजय परशुराम यांची जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/3814 दिनांक 15.09.2011रोजी एकत्रीत वेतनावर कंत्राटी महिला वैद्यकीय अधिकारी (स्त्री रोग व प्रसुती शास्त्र) पदावर नियुक्ती करण्यात आली. संबंधीतांना महासभेच्या मान्यतेने वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. संबंधीत हे मागील 10 वर्षापासुन मनपाकेच्या रुग्णालयातील ओपीडी दैनंदिन सर्व कामे करीत आहेत. त्याचबरोबर मागील 1-2 वर्षापासूनप कोवि-19 प्रादुर्भाव रोखण्यासाठी संशयित रुग्णांची तपासणी, पॉझिटिव्ह रुग्णांना मार्गदर्शन करणे, बांधीतांच्या संपर्कातील व्यक्तीचा शोध देऊन त्यांची तपासणी करुन कोविड-19 च्या संसर्गाची साखळी तोडणे, लसीकरण कार्यक्रमांवर नियंत्रण व समन्वये ठेवणे, कोविड-19 तपासणी तसेच लसीकरणाचा दैनंदिन अहवाल पाठवणे व समन्वय ठेवणे, अशा प्रकारच्या आरोग्य विषयक जोखमीचे कार्य संबंधीत हे पार पाडीत आहेत. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत वैद्यकीय अधिकारी अभिनामाच्या रिक्त पदावर संबंधीतांनी सेवा नियमीत करुन कायम सेवेत सामावुन घेण्याची विनंती केली आहे. संबंधीतांनी मागील दहा वर्षापासुन महापालिकेच्या आरोग्य विभागात बजावलेली सेवा तसेच त्यांच्याकडील अर्हता, पात्रता, अनुभव अशा आवश्यक बाबी लक्षात घेऊन महाराष्ट्र शासन, पत्र क्रं. डीएनसी-1004/2308/प्र.क्र.70/2004/नवि-24 नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 16.112006 तसेच महानगरपालिकेतील प्रचलित पध्दतीनुसार (1) डॉ. कोटलवार श्रुती रवि (2) डॉ. राठोड विजय परशुराम यांना तांत्रिक खंड व वय क्षमापनासह सेवा समावेशनाने महानगरपालिकेच्या आरोग्य

आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी अभिनामाच्या रिक्त पदावर सेवा नियमीत करुन कायम सेवेत सामावून घेण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक** :- आनंद चव्हाण **अनुमोदक** :- अ. शमीम अब्दुल्ला

**विषय क्रं. 06** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकाक हद्दीत सर्व्हे नं. 64 वजिराबाद शाहु महाराज पुतळा ते रेल्वे पट्टी कडे जाणारा रस्ता 12 मि. रुंदीचा संपादीत करुन उर्वरीत जागा रहिवाशी वापर करणे बाबत.

**सुचक** :- अ. शमीम अब्दुल्ला **अनुमोदक** :- विरेंद्रसिंघ गाडीवाले

**विषय क्रं. 07** **प्रस्ताव**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभगाचे शासन निर्णय क्रं. एनव्हीसी-302002/1350/प्र.क्र 157/03/नवि-22 दिनांक 17 ऑगस्ट 2004 व्दारे शासनाने महानगरपालिका आस्थापनेवर इमारत निरीक्षक या अभिनामाच्या 05 पदास वेतनश्रेणी 5500-9000 लागु करण्याबाबत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने दिनांक 30.01.2009 रोजी ठराव क्रं. 194 व्दारे मान्यता दिली आहे. तथापि सदर ठरावा मध्ये शासन मान्यतेच्या दिनांका पासुन वेतनश्रेणी लागु करण्याबाबत उल्लेख झाला असुन त्यामध्ये अंशतः बदल करुन शासनाने इमारत निरीक्षक या अभिनामाच्या पदास दिनांक 17 ऑगस्ट 2004 रोजी दिलेल्या मान्यतेच्या दिनांका पासुन वेतनश्रेणी 5500-9000 लागु करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते समंत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. सदरचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- शबाना बेगम मो. नासेर

**स्वाक्षरीत/-**

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)** **(स. अजीतपालसिंघ संधु)**

**नगरसचिव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**